# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०२१

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### पंचायत समिती (ता.हवेली, जि.पुणे) अंतर्गत छोटे पाटबंधारे विभागांकडून नियमबाह्य कामे झाल्याबाबत

**(१) १०९ (१२-०४-२०२०). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंचायत समिती (ता.हवेली, जि.पुणे) अंतर्गत छोटेपाटबंधारे विभागांकडून माहे सप्टेंबर, २०१६ ते जून, २०१९ या कालावधीमध्ये नियमबाह्य कामे झाली असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास सदरहू कामे करत असताना शेतकरी वारंवार संबंधित विभागाकडे सदरहू कामाबाबत तक्रार करीत असताना संबंधित विभागाने कोणतीही कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत, व त्यानुसार, नियमबाह्य कामांची चौकशी करून संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (५-१-२०२१) :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

लघु पाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद,पुणे अंतर्गत लघु पाटबंधारे उप विभाग, हवेली, ता. हवेली या कार्यक्षेत्रामध्ये माहे सप्टेंबर २०१६ तेजून, २०१९ या कालावधीत हाती घेणेत आलेली कामे पुर्ण झालेली आहेत. याबाबत कोणत्याही शेतकऱ्याकडून लघु पाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद, पुणे आणि लघु पाटबंधारे उप विभाग, हवेली, ता. हवेली कार्यालयाकडे तक्रार प्राप्त झालेली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## गोंदिया जिल्हा परिषदेत विदयुतीकरण कंत्राटदाराचे चुकीच्या पध्दतीचे नोंदणीकरण झाल्याबाबत

**(२) १४० (११-०४-२०२०). श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदिया जिल्हा परिषदेत विद्युतीकरण कंत्राटदाराचे चुकिच्या पध्दतीचे नोंदणी करण्याची बाब माहे सप्टेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हा परिषद गोंदिया येथे विद्युत अभियंताचे पद कार्यरत नसताना कार्यकारी अभियंता जिल्हा परिषद गोंदिया यांनी दिनांक ३ ऑगस्ट, २०१९ रोजी ३ कंत्राटदाराचे नोंदणीकरण चुकीच्या पध्दतीने केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्हा परिषद गोंदिया येथे विद्युत कामे बांधकाम विभाग पहात असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणाची चौकशी करुन तत्कालीन कार्यकारी अभियंता यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (३-१२-२०२०) :** (१) विदयुत कंत्राटदाराचे नोंदणीकरण चुकीच्या पध्दतीने करण्यात आलेले नाही.

(२) ग्राम विकास विभागाच्या शासन निर्णय दिनांक ०२ डिसेंबर, २०१६ मधील तरतुदीनुसार विदयुत कंत्राटदाराची वर्गवारी व काम करण्याची आर्थिक क्षमता नुसार योग्य पध्दतीने नोंदणीकरण करण्यात आले आहे.

(३) होय.

(४) विदयुत कंत्राटदाराचे नोंदणीकरण चुकीच्या पध्दतीने करण्यात आलेले नाही, त्यामुळे कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अमरावती परिषद अंतर्गत समाजकल्याण अधिकारी पद रिक्त असल्याबाबत

**(३) १०५७ (१६-०४-२०२०). श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हा परिषद अंतर्गत समाजकल्याण विभागाचे तीन वर्षांपासून पद रिक्त असून या विभागाचे कामकाज प्रभारींच्या मार्फत सुरु असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, समाजकल्याण विभागामार्फत जिल्हयात विविध कल्याणकारी योजना राबविल्या जात असून दिव्यांगांच्या, मागासलेल्या घटकांच्या वैयक्तिक आणि सामूहिक योजनेचा समावेश असून या विभागाचे कामकाज प्रभारी असल्याने विविध योजनांचा लाभ लाभार्थ्यांपर्यंत पोहचत नसल्याने बहुतांश लाभार्थी लाभापासून वंचित राहत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, समाजकल्याण अधिकाऱ्याचे रिक्त पद भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (३-१२-२०२०) :** (१) होय.
(२) जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती वर्ग-१ हे पद दिनांक २१/६/२०१७ पासून रिक्त आहे. सदर रिक्त पदाचा प्रभार अन्य प्रभारी अधिकाऱ्यांकडे देण्यात येवून त्यांचेमार्फत समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद, अमरावती अंतर्गत येणाऱ्या विविध योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात आलेली आहे. त्यामुळे राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांच्या लाभापासून लाभार्थी वंचित नाही.
(३) ग्राम विकास विभागाकडून संबधित विभागांना व संबंधित शासकीय अधिकाऱ्यांना, सर्व प्रचलित नियमांचे व शासनाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशांचे पालन करुन, जिल्हा परिषद, अमरावती येथील रिक्त पदे तातडीने भरण्याचे निर्देश देण्यात आलेले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ठाणे जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग, भिवंडी येथे प्रभारी उपअभियंता यांनी केलेला गैरव्यवहार

**(४) १०५९ (११-०४-२०२०). श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग, भिवंडी येथे प्रभारी उपअभियंता म्हणून ३ वर्षापासून काम पाहणारे शाखा अभियंता दत्तु गिते यांनी मोठया प्रमाणात गैरव्यवहार केल्याचे स्थानिक लोकप्रतिनिधींनी मुख्य सचिव यांच्याकडे निवेदन देऊन कारवाई करण्याची मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाच्या प्रचलित नियमानुसार कोणत्याही अधिका-याकडे सहा महिन्यापेक्षा अधिक काळ पदभार नसावा असे स्पष्टपणे नमुद असतानाही श्री गिते यांच्याकडे गेल्या ३ वर्षापेक्षा अधिक काळ उपअभियंता पदाचा पदभार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, श्री दत्तु गिते हे शाखा अभियंता एकाच विभागात सलग गेल्या १६ वर्षापासून कार्यरत असून त्यांची बदली अदयापी झालेली नसून शाखा अभियंता व सहायक अभियंता श्रेणी-२ यांच्या सर्वसाधारण बदल्यांकरिता तयार करण्यात आलेल्या सन २०१२ च्या तात्पुरत्या सेवा ज्येष्ठता यादीमध्ये श्री.गिते यांचे नाव १८ व्या स्थानी असताना त्यांना भिवंडी उपविभागामध्ये १० वर्षे पूर्ण झाली आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) तसेच सन २०१२ मध्ये एकूण १६ लोकांच्या बदल्या करण्यात आल्या त्यामुळे गिते यांची बदली झालेली नसून सन २०१३ मध्ये बदल्या झाल्या नसल्याने सन २०१४ मध्ये सेवा ज्येष्ठता यादीत त्यांचे नाव दुस-या स्थानी आवश्यक असतानाही कार्यकारी अभियंता यांनी श्री.गिते यांना लाभ देण्याकरिता सन २०१४ च्या सेवा ज्येष्ठता यादीमध्ये त्यांचे नाव समाविष्ट करण्यात आलेले नाही, याचा फायदा श्री.गिते यांना होऊन तब्बल १६ वर्षे दत्तु गिते हे भिवंडी उपविभागामध्ये कार्यरत आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) तसेच भिवंडी तालुक्यातील मोठे उत्पन्न असलेल्या ग्रामपंचायतींनी ग्रामपंचायत निधीमधून केलेल्या कामाचे मुल्यांकन शाखा अभियंता यांनी केले त्या सर्व कामांची चौकशी करण्यात आली आहे काय,
(६) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुषंगाने दोषींवर कारवाई करण्यासह श्री गिते यांची तात्काळ बदली करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (३-१२-२०२०) :** (१) नाही.
(२) नाही.
(३) नाही.
(४) नाही.
(५) अशी बाब नाही.
(६) प्रश्न उद्भवत नाही.
(७) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्याच्या जलसंपदा विभागासाठी तरतूद करण्यात आलेल्या निधीपैकी आठ हजार ६४२ कोटी ६७ रुपयांचा निधी खर्चित असल्याबाबत**

**(५) ११३६ (१३-०४-२०२०). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्याच्या जलसंपदा विभागासाठी तरतूद करण्यात आलेल्या निधीपैकी तब्बल आठ हजार ६४२ कोटी ६७ रुपयांचा निधी खर्च झाला नसून पुढील तीन महिन्यात हा निधी खर्च करणे आवश्यक आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, निळवंडे धरणासाठीचे १९८ कोटी रुपये जलसंपदा विभागाकडे पडून असताना शासनाने याच कारणास्तव साई संस्थानकडून निधी घेतला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच प्रधानमंत्री कृषि सिंचन योजनेतील २६ आणि बळीराजा कृषि संजीवनी योजनेच्या ९१ प्रकल्पांना अद्यापही मान्यता देण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबतची चौकशी करुन दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील (२४-१२-२०२०) :** (१) हे खरे नाही.
सन २०१९-२० या आर्थिक वर्षामध्ये जलसंपदा विभागासाठी पूरक मागणीसह एकूण रु.२२६२१.३६९३ कोटी तरतूद करण्यात आली होती त्यापैकी वित्त विभागामार्फत, विभागासाठी रु१००५३.०४६३ कोटी इतका निधी उपलब्ध झालेला असून त्यापैकी रु ९८४०.२५० कोटी निधी खर्च झालेला आहे.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.

प्रधानमंत्री कृषि सिंचन योजनेतील २६ प्रकल्प आणि बळीराजा जल संजीवनी योजनेच्या ९१ प्रकल्पांना केंद्र शासनानेमान्यता दिली असून प्रकल्पची कामे प्रगती पथावर आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**धुळे शहरातील कै.भाऊसाहेब हिरे शासकीय व वैद्कीय महाविद्‌यालय व रुग्णालय येथील असलेले अभ्यागत मंडळामध्ये सर्वपक्षीय सदस्यांचा समावेश करणेबाबत**

**(६) ११६७ (१३-०४-२०२०). श्री.फारूक शाह (धुळे शहर) :** सन्माननीय **वैद्‌यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धुळे शहरातील कै.भाऊसाहेब हिरे शासकीय व वैदयकीय महाविद्‌यालय व रुग्णालय, येथील असलेले अभ्यांगत मंडळा (कमिटी) मध्ये सर्वपक्षीय, सदस्यांची नेमुणक केली नसल्याचे माहे नोव्हेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सध्या जूनी समितीच कार्यरत असल्याने ही समिती स्थानिक लोकप्रतिनिधीना समाविष्ट करुन त्यांची मते जाणुन न घेताच कामकाज करत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, स्थानिक लोकप्रतिनिधींना आपल्या मतदार संघातील नागरिकांची कामे करण्याबाबत अडचणी निर्माण होत असल्याने शासनाने त्वरीत या कमिटीमध्ये सुधारणा करुन सर्वपक्षीय सदस्यांचा समावेश करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अमित विलासराव देशमुख (१७-१२-२०२०) :** (१) संबंधित शासन निर्णयानुसार अभ्यागत मंडळात सर्वपक्षीय सदस्यांची नेमणुक करण्याची तरतूद आढळून येत नाही.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**बुलढाणा जिल्हयातील खडकपूर्णा प्रकल्प विभाग (संत चोखासागर जलाशय) देऊळगावराजा कार्यालयाच्या स्थलांतरणाबाबत**

**(७) १४६३ (११-०४-२०२०). श्री.संजय गायकवाड (बुलढाणा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बुलढाणा जिल्हयातील खडकपूर्णा प्रकल्प विभाग (संत चोखासागर जलाशय) देऊळगावराजा कार्यालय स्थलांतरीत न करणेबाबत स्थानिकांनी तत्कालिन जलसंपदा राज्यमंत्री यांना लेखी निवेदने दिली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या संदर्भात शासनाने काही निर्णय घेतला आहे काय व त्यांचे स्वरुप काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील (०१-०१-२०२१) :** (१) होय.
(२) खडकपूर्णा प्रकल्पाची कामे प्रगतीपथावर असल्याने सदर कार्यालयाच्या स्थलांतरणाबाबत निर्णय घेण्यात आलेला नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**परभणी जिल्हा सामान्य रुग्णालयातील सर्व विभागातील वार्ड व नातेवाईकांच्या निवाऱ्यामध्ये सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(८) १९७४ (२५-०३-२०२०). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परभणी जिल्ह्यातील जिल्हा सामान्य रुग्णालयातील अस्थिव्यंग, स्त्री रुग्णालय व सामान्य रुग्णालय या तीन विभागातील वार्ड व परिसरासह स्त्री रुग्णालयासमोर उभारण्यात आलेल्या रुग्णांच्या नातेवाईकांच्या निवा-याची स्वच्छते अभावी दुरवस्था झाली असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत रुग्ण व नातेवाईकांकडून वारंवार रुग्णालय प्रशासनाकडे तक्रारी केल्या असतांनाही रुग्णालय प्रशासनाचे त्याकडे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन परभणी जिल्हा सामान्य रुग्णालयातील सर्व विभागातील वॉर्ड व परिसरासह नातेवाईकांच्या निवाऱ्यामध्ये सोयी-सुविधा उपलब्ध करुन स्वच्छता राबविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे (२८-१२-२०२०) :** (१), (२) व (३) हे खरे नाही. रुग्णांच्या नातेवाईकांच्या निवाऱ्याची स्वच्छता, स्वच्छता कर्मचाऱ्यांकडुन नियमित केली जाते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोकणातील पंतप्रधान व मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेत अधिका-यांनी केलेला गैरव्यवहार**

**(९) २२८८ (१२-०४-२०२०). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.संजय जगताप (पुरंदर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोकणात राबविण्यात येणाऱ्या पंतप्रधान व मुख्यमंत्री ग्रामसकडक योजनेच्या महाराष्ट्र ग्रामीण विकास संस्थेत अनेक अधिकारी-कर्मचारी पुणे, अलिबाग येथील प्रयोगशाळेतील अधिकारी-कर्मचाऱ्यांशी संगनमत करुन या योजनेतील रस्त्यांची निकृष्ट कामे चांगली असल्याचे अहवाल देत असल्याचे दिनांक १४ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय
(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन दोषी अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (७-१-२०२१)** (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सिंदखेड राजा (जि बुलढाणा) येथील राजे लखोजीराव जाधव व अन्य समाधीस्थळाचे सुशोभीकरण करणेबाबत**

**(१०) २३९५ (०६-०४-२०२०). श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिंदखेड राजा (जि. बुलढाणा) येथील छत्रपती शिवाजी महाराजांचे आजोबा आणि राष्ट्रमाता राजमाता जिजाऊ मासाहेब यांचे वडील राजे लखोजीराव जाधव आणि त्यांची मुले दत्ताजी राजे, अचलोजी राजे, राघोजीराव राजे व यशवंतराव राजे यांच्या समाधीस्थळांची देखभाली अभावी दुरवस्था झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, समाधीस्थळाच्या दर्शनासाठी देशभरातून भक्त येत असल्याने सर्व समाधीस्थळाचे सुशोभिकरण करण्याची मागणी स्थानिकांनी केली असून त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अमित विलासराव देशमुख (२१-१२-२०२०) :** (१) व (२) हे खरे नाही. राजे लखोजी राव जाधव, दत्ताजी राजे, अचलोजी राजे, राघोजीराव राजे व यशवंतराव राजे यांची समाधीस्थळे ही या विभागाची राज्य संरक्षित स्मारके नाहीत. तथापि राजे लखोजी राव जाधव यांचे समाधीस्थळ राष्ट्रीय संरक्षित स्मारक आहे. भारतीय पुरातत्व विभाग, नागपूर यांच्यामार्फत या स्मारकाच्या ठिकाणी वॉटर टायटेनिंग (Water tightening) आणि प्लींन्थ प्रोटेक्शन (Plinth protection) ही कामे प्रस्तावित करण्यात आली आहेत.
पर्यटकांच्या सुविधेकरीता पथमार्गाचे काम प्रगतीपथावर आहे. जिल्हा नियोजन समितीद्वारा सुधारीत सविस्तर प्रकल्प अहवाल महानिदेशक कार्यालय, दिल्ली यांच्याकडे मंजूरीकरीता प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पोंभुर्णा (जि. चंद्रपूर) पंचायत समिती कडून वैयक्तिक लाभाचे अनुदान प्रलंबित असल्याबाबत**

**(११) २६८९ (१२-०४-२०२०). श्री.सुभाष धोटे (राजूरा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पोंभुर्णा (जि. चंद्रपूर) पंचायत समिती कडून वैयक्तिक लाभाचे अनुदान गेली दीड वर्षा पासून न मिळाल्याने ग्रामीण भागातील अनेक लाभार्थी योजनेपासून वंचीत असल्याचे दिनांक १७ जानेवरी, २०२० रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दीड वर्षापासून लाभार्थ्यांना अनुदान न मिळण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, अनुदानाचे वाटप तात्काळ करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (५-१-२०२१) :** (१) व (२) हे अशंतः खरे आहे.
वैयक्तिक लाभाच्या कामांचे अनुदान या योजनेअंतर्गत पंचायत समिती पोंभुर्णा, जि. चंद्रपूर यांना दि.११.२.२०२० रोजी आयुक्त (नरेगा), नागपूर कार्यालयाकडून अनुदान प्राप्त झाल्याने त्यानंतर संबंधित लाभार्थ्यांना अनुदानाचे वाटप करण्यात आले आहे.
(३) व (४) पंचायत समिती पोंभुर्णा, जि. चंद्रपूर यांना दि.५.३.२०२० व दि.३०.७.२०२० रोजी आयुक्त (नरेगा), नागपूर कार्यालयाकडून अनुदान प्राप्त झाल्याने पंचायत समिती पोंभुर्णा, जि. चंद्रपूर कार्यालयाकडून उर्वरीत निधी वितरणाची कार्यवाही सुरू आहे.

---

**उमरखेड (जि.यवतमाळ) येथील पंचायत समितीच्या गैरकारभाराबाबत**

**(१२) ३३४५ (१६-०४-२०२०). श्री.नामदेव ससाने (उमरखेड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उमरखेड (जि.यवतमाळ) येथील पंचायत समितीच्या गैरकारभारामुळे शासनाच्या विविध योजनांतील सुमारे १२१ लाभार्थ्यांना गेल्या तीन वर्षापासून शासकीय अनुदान मिळाले नसल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळून आले,

(३) असल्यास, या लाभार्थ्यांना तातडीने अनुदान देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (५-१-२०२१) :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) पंचायत समिती, उमरखेड अंतर्गत महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना तसेच स्वच्छ भारत मिशन व इतर विभागातंर्गत पात्र असलेल्या लाभार्थ्यांना विहीत कालावधीत त्यांचे अनुदान देण्याची कार्यवाही पंचायत समिती स्तरावरून करण्यात आलेली असुन कोणताही पात्र लाभार्थी लाभापासून वंचित राहीलेला नाही.

तसेच महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना या योजनेअंतर्गत मजुरांच्या कामाच्या मागणीनुसार अकुशल मजुरांना काम उपलब्ध करून देण्यात येते. आतापर्यंत या योजने अंतर्गत ९९.६४% इतक्या मजूरांना देय असलेली मंजूरी विहीत कालावधीत अदा करण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पाटस (ता. दौंड, जि. पुणे) येथील जिल्हा परिषदेच्या शाळेची इमारत दुरूस्त करणेबाबत**

**(१३) ३७१५ (१६-०४-२०२०). श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाटस (ता. दौंड, जि. पुणे) येथील जिल्हा परिषदेच्या शाळेची भिंत कोसळून दिनांक ४ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास अपघात झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शाळा दुरुस्तीसाठी नागरिकांनी वारंवार मागणी करून देखील प्रशासनाने केलेल्या दुर्लक्षामुळे अपघात घडल्याचे प्रथमदर्शनी निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यापूर्वी दिनांक ८ ऑगस्ट, २०१९ रोजी देखील कोसळून अपघात झालेला असणे, याच वेळी शाळेच्या मुख्याध्यापकांनी लेखी पत्राद्वारे इमारात धोकादायक झाल्याची बाब पंचायत समिती व जिल्हा परिषद यांना कळविली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त इमारत दुरुस्त करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (२२-१२-२०२०) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

शाळेच्या एका वर्गखोलीच्या बाहेरील काही भाग बंद खोलीमध्ये कोसळलेला होता. या घटनेत कोणत्याही विद्यार्थ्यांना इजा अथवा अपघात झालेला नाही. सदरील खोली ना-दुरुस्त असल्याने त्याचा वापर अध्यापनासाठी करण्यात येत नव्हता.

(२) हे खरे नाही.

शाळा दुरुस्तीसाठी मागणी केल्यानुसार, जिल्हा परिषद निधी सन २०१८-१९ अंतर्गत रु.५.०० लक्ष शाळा दुरुस्तीसाठी मंजूर करण्यात आले आहेत.

(३) हे खरे नाही.

(४) जिल्हा परिषद निधी सन २०१८-१९ अंतर्गत रु.५.०० लक्ष शाळा दुरुस्तीसाठी मंजूर करण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सोलापूर जिल्ह्यात गटशिक्षणाधिकारी पदे रिक्त असल्याबाबत**

**(१४) ४०२७ (१६-०४-२०२०). श्री.राम सातपुते (माळशिरस) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यात अकरा पैकी फक्त तीन गटशिक्षणाधिकारी पद कार्यरत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू अकरा जागांपैकी ८ पदे रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तीन गटशिक्षणाधिकारी अधिकाऱ्यांवर पदभार देण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (३०-१२-२०२०) :** (१) होय.
(२) होय.
(३) नाही, ज्या तालुक्यात गटशिक्षणाधिकारी पद रिक्त आहे, त्या तालुक्यात स्थानिक शिक्षण विस्तार अधिकारी यांचेकडे पदभार देण्यात आला आहे. एकाही शिक्षणाधिकाऱ्याकडे इतर तालुक्याचा अतिरिक्त पदभार नाही.
(४) ग्राम विकास विभागाकडून संबधित विभागांना व संबंधित शासकीय अधिकाऱ्यांना, सर्व प्रचलित नियमांचे व शासनाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशांचे पालन करुन, जिल्हा परिषद, सोलापूर येथील रिक्त पदे तातडीने भरण्याचे निर्देश देण्यात आलेले आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जत (जि.सांगली) तालुक्यातील शासकीय व निमशासकीय कार्यालयामधील पदे रिक्त असल्याबाबत

**(१५) ४४०२ (२०-०३-२०२०). श्री.विक्रमसिंह सावंत (जत) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जत (जि.सांगली) तालुक्यातील शासकीय व निमशासकीय कार्यालयामधील शेकडो पदे रिक्त असल्याने सर्वसामान्य जनतेची महत्वाची कामे होण्यास विलंब होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जत तालुक्यातील शासकीय व निमशासकीय कार्यालयातील रिक्त पदे तात्काळ भरण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अजित पवार (१५-१२-२०२०)** (१) हे अंशत: खरे आहे. उपलब्ध आकडेवारीनुसार जत (जि. सांगली) तालुक्यातील शासकीय व निमशासकीय कार्यालयांमध्ये गट-अ ते गट-ड मधील एकूण ३२०८ पदे मंजूर असून त्यापैकी ७०४ पदे रिक्त आहेत. तथापि उपलब्ध अधिकारी / कर्मचारी यांच्याकडून सर्वसामान्य जनतेची महत्त्वाची कामे प्राधान्याने करण्यात येत आहेत.
(२) वित्त विभागाच्या दि.१६.०५.२०१८ च्या शासन निर्णयान्वये व त्यानंतर वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयान्वये शेतकऱ्यांना सुविधा पुरविण्यासाठी महत्त्वाच्या सेवेशी निगडित असलेली रिक्त पदे भरण्यास परवानगी देण्यात आलेली आहे.
वित्त विभागाच्या दि.२५ मे २०१७ च्या शासन निर्णयान्वये, सर्व प्रशासकीय विभागांना त्यांच्या (खुद्द) व त्यांच्या नियंत्रणाखालील कार्यालयांच्या आस्थापनेवरील सर्व मंजूर पदांचा आढावा घेऊन तद्संबंधीच्या सुधारित आकृतीबंधास उच्चस्तरीय सचिव समितीची मान्यता घेणे आवश्यक करण्यात आले असुन, आढावा अंतिम झाल्यानंतरच रिक्त पदे भरावीत अशा सूचना दिल्या आहेत. तसेच विविध विभागांच्या पदांच्या अत्यावश्यकतेनुसार वित्त विभागाच्या दि. ९.६.२०१७ च्या शासन निर्णयान्वये गठित उपसमितीमार्फत मान्यता घेऊन रिक्त पदे भरण्यास

परवानगी दिली जाते.
सद्यस्थितीत, कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे अर्थव्यवस्थेवरील परिणाम व वित्तीय उपाययोजनांतर्गत सार्वजनिक आरोग्य विभाग आणि वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग वगळता अन्य विभागातील नविन पदभरतीवर तात्पुरत्या कालावधीसाठी निर्बंध घातले आहेत. सदर परिस्थितीत सुधारणा झाल्यानंतर पदे भरण्यात येतील.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोलापूर जिल्हा परिषदेतील अधिकाऱ्यांवर कारवाई करणेबाबत**

**(१६) ४४६५ (१६-०४-२०२०). श्री.राम सातपुते (माळशिरस) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर जिल्हा परिषदेत गेल्या अडीच वर्षात पदाधिकाऱ्यांचे नियंत्रण नसल्याने अधिकारी काम विलंबाने करीत आल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अधिकारी लोकप्रतिनिधींच्या मागणीला, समस्यांना कोणतीही उत्तर देत नाहीत हे खरे आहे काय,
(३) असल्यास, या अधिकाऱ्यांमार्फत विकास कामांकडे दुर्लक्ष होत असल्यामुळे अनेक विकासकामे प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (३०-१२-२०२०) :** (१) नाही.
(२) नाही.
(३) नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**हिंगोली जिल्हयात समग्र शिक्षा अभियानांतर्गत शाळासाठी देण्यात आलेले संयुक्त शाळा या अनुदानाचा निधीचा विनियोग करणेबाबत**

**(१७) ४६३२ (१६-०४-२०२०). श्री.तान्हाजी मुटकुळे (हिंगोली) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिंगोली जिल्हयात समग्र शिक्षा अभियानांतर्गत शाळासाठी देण्यात आलेले संयुक्त शाळा अनुदानाचे अंदाजे अडीच कोटी निधी पंचायत समितीकडे जमा असून अदयाप ही हा निधी सदर अनुदान शाळा व्यवस्थापन समितीच्या बँक खात्यात वर्ग करण्यात आला नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे जिल्हा परिषद शाळांची अनेक विकास कामे प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाकडून सदर निधी संबंधित शाळांना वर्ग करण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (२२-१२-२०२०) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) हिंगोली जिल्हयात जिल्हा परिषदेच्या एकूण ८७९ शाळा आहेत. विद्यार्थी संख्येनुसार महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षण परिषद यांच्या मार्गदर्शक सूचनेनुसार संयुक्त शाळा अनुदान गट स्तरावरुन शाळा व्यवस्थापन समितीच्या खात्यावर वर्ग करण्यात आले असून संबंधित शाळा व्यवस्थापन समितीने सदर निधीचा विनीयोग केला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मेहकर (जि. बुलढाणा) तालुक्यात स्थानिक तहसिल कार्यालयातील रिक्त पदे भरण्याबाबत**

**(१८) ४७११ (२५-०३-२०२०). श्री.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मेहकर (जि. बुलढाणा) येथील तहसिल कार्यालयात एकूण पाच नायब तहसिलदार पदे मंजूर असतांना केवळ दोनच नायब तहसिलदार कार्यरत असल्याची बाब माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तालुक्यातील विकास कामांवर परिणाम होऊन नागरिकांचीही गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार सदरची रिक्त पदे तात्काळ भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. बाळासाहेब थोरात (११-१२-२०२०) :** (१), (२), (३) व (४) नायब तहसिलदारच्या एकूण पाच पदांपैंकी एक पद हे निरीक्षण अधिकारी (पुरवठा संवर्गाचे) असून उर्वरित चार नायब तहसिलदार संवर्गाच्या पदांपैकी दोन नायब तहसिलदार कार्यरत आहेत.

प्रशासकीय कामकाजाची तसेच नागरिकांची गैरसोय होवू नये म्हणून विभागीय आयुक्त कार्यालयाच्या स्तरावरून दोन रिक्त पदांचा अतिरिक्त कार्यभार अन्य अधिकारी यांचेकडे सोपविण्यात आलेला आहे.

सन २०१९-२० या भरती वर्षाकरिता अमरावती महसूल विभागातील नायब तहसिलदार संवर्गाची पदोन्नती कोट्यातील रिक्त असलेली पदे भरण्याची कार्यवाही विभागीय आयुक्त स्तरावर सुरू आहे. तसेच सरळसेवा कोट्यातील नायब तहसिलदार संवर्गातील राज्यातील रिक्त पदे राज्यसेवा परिक्षा-२०२० द्वारे भरण्याकरिता ७३ पदांचे मागणीपत्र महाराष्ट्र लोकसेवा आयोगास पाठविण्यात आले आहे.

---

**आराधी, वाघ्या, मुरळी, पोतराज व गोंधळी इत्यांदींना लोककलाकार म्हणून शासकीय योजनांचा लाभ मिळण्याबाबत**

**(१९) ४७५७ (२२-०३-२०२०). ॲड.माणिकराव कोकाटे (सिन्नर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.बबनराव शिंदे (माढा) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अखिल भारतीय आराधी महासंघाचे वतीने मुंबईच्या आझाद मैदान येथे आराधी, वाघ्या,

मुरळी, पोतराज आणि गोंधळी या समाजाने दिनांक ३० डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास आंदोलन केल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अखिल भारतीय आराधी महासंघाच्या पदाधिकाऱ्यांनी आराधी, वाघ्या, मुरळी, पोतराज आणि गोंधळी यांना लोककलाकार म्हणून मानधन व पेन्शन तसेच घरकुल योजनेचा लाभ देण्यात यावा यासह अन्य विविध मागण्यांबाबतचे निवेदन मा.मुख्यमंत्री यांना देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अमित विलासराव देशमुख (१६-१२-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाचा शासन निर्णय दि. ९ सप्टेंबर, २०१९ अन्वये सन्मानार्थी वृध्द साहित्यिक व कलाकार यांच्या मानधनात दिडपट वाढ करण्यात आली आहे.

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण अधिनियम १९७६ मध्ये महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण (जमिनीचे वाटप) नियम १९८१ मधील नियम १३ येथील तरतूदीनुसार विविध प्रवर्गांकरिता असलेले आरक्षण निश्चित करण्यात आलेले आहे. त्यानुसार महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरणाच्या मंडळामार्फत बांधण्यात आलेल्या घरांच्या सोडतीसाठी जाहिरात देऊन कार्यवाही करण्यात येते. म्हाडाच्या गृहनिर्माण योजनेमध्ये कोणत्याही विशिष्ट सांप्रदायासाठी / समाजासाठी घरकुल योजना राबविण्याची तरतूद नाही.

शालेय शिक्षण विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या इयत्ता १ ली ते १० पर्यंत सर्वांना निशुल्क शिक्षण योजनेनुसार इयत्ता १ ली ते इयत्ता १० वी पर्यंत सर्वांना निशुल्क शिक्षण देण्यात येते. त्यामध्ये समाजातील सर्वच घटकांचा समावेश आहे.

गृह विभागाचा शासन निर्णय दिनांक ९/१०/२०१८ अन्वये महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसेसमध्ये एकूण २७ प्रकारच्या सवलती अनुज्ञेय करण्यात आलेल्या आहेत. सदर सवलतींचा लाभ आराधी सांप्रदायांच्या लोकांनाही मिळत आहे.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत विविध समित्यांवर अशासकीय सदस्य म्हणून अनुसुचित जाती प्रवर्गातील व्यक्तींची प्राधान्याने नियुक्ती करण्यात येते. त्यानुसार आराधी, वाघ्या मुरळी तसेच पोतराज इ. स्वरुपाचे काम करणाऱ्या व्यक्तींपैकी ज्या व्यक्ती अनुसुचित जाती प्रवर्गातील आहेत, त्यांना या विभागांतर्गतच्या योजनांचा लाभ अनुज्ञेय आहे.

बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) नियम २०१८ नुसार नोंदणीकृत बालगृहामध्ये बालकल्याण समितीच्या आदेशानुसार काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या मुलांना दाखल करण्यात येते. यामध्ये समाजाच्या सर्वच घटकांचा समावेश होतो.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रायगड जिल्हयातील १४ तालुक्यात कायमस्वरूपी गटशिक्षण अधिकारी नसल्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याबाबत**

**(२०) ५१८८ (१६-०४-२०२०). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) रायगड जिल्हयात एकूण १५ तालुक्यांमध्ये प्रत्येक तालुक्याला एक गटशिक्षण अधिकारी बंधनकारक असताना फक्त महाड तालुक्यालाच कायमस्वरूपी गटशिक्षण अधिकारी असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त जिल्हयात महाड सोडुन उर्वरीत १४ तालुक्यात कायमस्वरूपी गटशिक्षण अधिकारी नसल्याने तात्पुरत्या स्वरूपात प्रभारी गटशिक्षण अधिका-यांची नेमणूक करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उर्वरीत १४ तालुक्यात सन २००५ पासून प्रभारी गटशिक्षण अधिकारी म्हणून रायगड जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागातील अधिका-यांची तात्पुरती नेमणुक केली असल्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होवू नये म्हणून शिक्षण विभागात एकसूत्रीपणा आणण्यासाठी रायगड जिल्हयातील उर्वरीत १४ तालुक्यात तात्काळ कायमस्वरूपी गटशिक्षण अधिका-यांची नेमणूक करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (३०-१२-२०२०) :** (१) होय.

(२) होय.

(३) नाही.

(४) ग्राम विकास विभागाकडून संबधित विभागांना व संबंधित शासकीय अधिकाऱ्यांना, सर्व प्रचलित नियमांचे व शासनाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशांचे पालन करुन, जिल्हा परिषद, रायगड येथील रिक्त पदे तातडीने भरण्याचे निर्देश देण्यात आलेले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**लामकानी (ता. जि.धुळे) येथे ग्रामीण रुग्णालयासाठी निधीची तरतूद करणेबाबत**

**(२१) ५५५५ (२२-०३-२०२०). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) लामकानी (ता.जि.धुळे) येथे ग्रामीण रुग्णालय ४ वर्षापूर्वी मंजूर झाले असून मुख्य इमारत व निवासस्थान बांधकामासाठी अद्यापही निधीची तरतूद झालेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ग्रामीण रुग्णालयासाठी निधीची तरतूद करुन मुख्य इमारत व निवासस्थान बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे (०६-०१-२०२१) :** (१) हे खरे आहे.

(२) सदर ग्रामीण रुग्णालय मुख्य इमारत बांधकामाचे रु.१२८८.१३ लक्ष व निवास्थान बांधकामाचे रु.३९६.५७ लक्ष इतक्या किमतीच्या अंदाजपत्रक व आराखड्यास निधीच्या उपलब्धते नुसार प्रशासकिय मान्यता देण्याबाबतची कार्यवाही शासन स्तरावर सुरू आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**इंदिरा गांधी वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालय, नागपूर (मेयो) येथील परिचारिकांचे वेतन प्रलंबित असल्याबाबत**

**(२२) ६०६८ (१४-०३-२०२०). ॲड.आशिष जयस्वाल (रामटेक) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इंदिरा गांधी वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालय, नागपूर (मेयो) येथे दर महिन्याला वेळेवर वेतन मिळत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सेवार्थ प्रणालीने वेतन देण्यात येत असून वेळेवर वेतन देण्याचे आश्वासन देवूनही माहे डिसेंबर- २०१९ चे वेतन दि. २६ जानेवारी, २०२० रोजी पर्यंत देखील परिचारिकांना वेतन न मिळण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, परिचारिकांना वेळेवर वेतन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अमित विलासराव देशमुख (२१-१२-२०२०) :** (१) हे खरे नाही.

(२) नागपूर येथील इंदिरा गांधी शासकीय महाविद्यालय व रुग्णालय येथील सर्व अधिकारी/कर्मचारी यांचे डिसेंबर, २०१९ चे वेतन देयक दिनांक २३.१२.२०२० रोजी कोषागार कार्यालयास सादर करण्यात आले होते. एकूण कर्मचाऱ्यांपैकी २९९ अधिपरिचारिकांचे वेतन दिनांक ३०.१२.२०१९ रोजी अदा करण्यात आले. मात्र सुमारे ८८ अधिपरिचारिका व २९ परिसेविका यांच्या वेतन देयकात जी.पी.एफ. कपातीबाबत कोषागार कार्यालयाकडून त्रुटी काढण्यात आल्या व सदर देयक दिनांक ३१.१२.२०१९ रोजी परत करण्यात आले. वेतन देयकातील त्रुटींची पूर्तता करुन त्याच दिवशी म्हणजे दिनांक ३१.१२.२०१९ रोजी देयक पुन्हा तयार करण्यात आले. परंतु संस्थेचे प्रशासकीय अधिकारी दिनांक ३१.१२.२०१९ रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले होते. त्यामुळे नवीन प्रशासकीय अधिकाऱ्यांची नेमणूक करुन वेतन देयके दिनांक ०९.०१.२०२० रोजी कोषागार कार्यालयास सादर करण्यात आले. परंतु कोषागार कार्यालयातील तांत्रिक अडचणींमुळे दिनांक २७.०१.२०२० रोजी वेतन देयक पारित झाले व उर्वरित कर्मचाऱ्यांना त्याच दिवशी वेतन अदा करण्यात आले.

(३) परिचारिकांना वेळेवर वेतन देण्याकरिता प्रशासकीय अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात आली असून सर्व अधिकारी/कर्मचारी यांचे वेतन वेळेवर व महिन्याच्या १ तारखेच्या आत देण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मनोर (जि.पालघर) येथील प्रसूतिगृहाची दुरुस्ती करणेबाबत

**(२३) ६२५९ (२५-०३-२०२०). श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) मनोर (जि.पालघर) येथे सार्वजनिक बांधकाम विभागाने ऑडीट करीत धोकादायक ठरवलेल्या इमारतीमध्येच प्रसूतिगृह सुरु असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रशासनाच्या दुर्लक्षीपणामुळे सदर इमारतीत जन्माला येणाऱ्या नवजात बालकांच्या जीवाला धोका निर्माण होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(४) असल्यास, तदनुषंगाने पालघर येथे असलेले एकमेव प्रसूतिगृहाची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे (२९-१२-२०२०) :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) व (४) ग्रामीण रुग्णालय, मनोर जि. पालघर येथील प्रसुतीगृह सुस्थितीत असून त्याच्या वरच्या मजल्यावर ब्लड बँकेचे इमारत काम प्रगतीपथावर असल्याने तात्पुरत्या स्वरुपासाठी प्रसुती कक्ष बंद ठेवण्यात आला आहे. प्रसुतीसाठी आलेल्या रुग्णांना पालघर ग्रामीण रुग्णालयाच्या आवाराच्या लगत असलेल्या सर जे.जे. रुग्णालय समूहाचे आरोग्य पथक, पालघर येथे पाठविण्यात येते व प्रसुतीसाठी आलेल्या रुग्णांची गैरसोय होणार नाही याची दक्षता घेण्यात येत आहे. ब्लड बँकेच्या बांधकामामुळे प्रसुतिगृहात होणारी गळती बंद झाल्यावर ग्रामीण रुग्णालय, मनोर जि. पालघर येथील प्रसुतीगृह पूर्ववत सुरु करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## भारतीय अन्न महामंडळातर्फे (एफ.सी.आय.) मेयो रूग्णालयाला निकृष्ट दर्जाचा धान्य पुरवठा होत असल्याबाबत

**(२४) ६३०५ (१३-०४-२०२०). डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील रुग्णांना पोषण आहार मिळावा व रोगप्रतिकारक शक्ती वाढावी या हेतूने शासकीय रुग्णालयांना शासनाच्या भारतीय अन्न महामंडळातर्फे (एफ.सी.आय.) धान्याचा पूरवठा मेडीकल व मेयो रुग्णालयाला निकृष्ट दर्जाचा बुरशीयुक्त गहू व तांदूळ पूरवठा होत असल्याचे दिनांक २२ नोव्हेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निकृष्ट दर्जाच्या धान्य पुरवठ्यामुळे रुग्णाच्या आरोग्याचा प्रश्न चिन्ह निर्माण होत असल्याने याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अमित विलासराव देशमुख (१८-१२-२०२०) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वर्धा जिल्हातील मौजा देऊरवाडा (ता. आर्वी) व मौजा सिरसोली व मौजा गौरखेडा (ता. आष्टी) येथील नदीला संरक्षण भिंत मंजुर करून निधी उपलब्ध करणेबाबत**

**(२५) ६५७४ (११-०४-२०२०). श्री.दादाराव केचे (आर्वी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजा देऊरवाडा (ता. आर्वी, जि. वर्धा) व मौजा सिरसोली, गौरखेडा (ता. आष्टी, जि. वर्धा) येथे नदीला गावाच्या भागाकडून संरक्षण भिंत बांधण्याबाबत पत्राद्वारे मागणी करण्यात आली, हे खरे आहे काय,
(२) मौजा देऊरवाडा, (ता. आर्वी,) मौजा सिरसोली, व मौजा गौरखेडा, (ता. आष्टी) येथे संरक्षण भिंत बांधण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील (१६-१२-२०२०) :** (१) अंशत: खरे आहे. मौजा देऊरवाडा (ता. आर्वी, जि. वर्धा) या गावाच्या भागाकडून संरक्षण भिंत होण्याबाबत पत्राद्वारे मागणी करण्यात आली आहे. मौजा सिरसोली (ता. आष्टी, जि. वर्धा) तसेच नगर पंचायत आष्टी, जि. वर्धा येथील नदीला गावाच्या भागाकडून संरक्षण भिंतीबाबत मागणी प्राप्त झालेली दिसून येत नाही.
(२) मौजा देऊरवाडा (ता. आर्वी, जि. वर्धा) येथील पुर संरक्षण भिंतीच्या कामाचे अंदाजपत्रक तयार झाले असून तत्पुर्वी शासन निर्णय, जलसंपदा विभाग, दिनांक ३१.०८.२०१९ नुसार प्रथम लाल व निळ्या पुर रेषा आखणीचे काम पूर्ण झाल्यावरच पुर संरक्षण कामे हाती घेण्यात यावे असे निर्देश आहेत. त्याअनुषंगाने कार्यवाही सुरु आहे. तसेच मौजा देऊरवाडा येथील लाल व निळया पूर रेषा आखणीच्या कामाचे अंदाजपत्रक अधीक्षक अभियंता, उर्ध्व वर्धा सिंचन मंडळ, अमरावती कार्यालयाने मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, अमरावती कार्यालयास सादर केले असून अंदाजपत्रक तपासणीची कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**किसनपूर (ता.सडक अर्जुनी, जि. गोंदिया) येथील जि.प. प्राथमिक शाळेच्या आवार भिंतीला मंजूरी मिळण्याबाबत**

**(२६) ६८६८ (१६-०४-२०२०). श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) किसनपूर (ता.सडक अर्जुनी, जि. गोंदिया) येथील जि.प. प्राथमिक शाळेच्या इयत्ता १ ते ४ पर्यंतची शाळेला आवारभिंत बांधकामाचा प्रस्ताव शाळेकडून जि. प. शिक्षण विभागाला पाठवूनही सदर आवार भिंतीला मंजूरी मिळाली नसल्याने विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण होत असल्याचे दिनांक ३ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जि.प. शाळेच्या आवार भिंतीकरीता शासन निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (२२-१२-२०२०) :** (१) हे खरे नाही.

(२) शासन शिक्षण विभाग शासन निर्णय दि.२९.६.२०१३ मधील तरतुदीनुसार पक्की संरक्षण भिंत शक्य नाही. त्यामुळे सदर शाळा परिसराच्या सभोवताली बांबू व मेहंदीचे कुंपण करण्यात आले आहे.

जिल्हा वार्षिक योजनेतर्गंत जि.प.शाळेच्या आवारभिंतीकरिता निधी उपलब्ध करुन देण्याबाबतचा प्रस्ताव शासकीय जमिनीवरील अतिक्रमण हटविणे या शिर्षकांतर्गत मंजूर करण्याबाबत जिल्हाधिकारी यांना सादर करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**धरणातून शेतीसाठी सोडण्यात येणारी आवर्तने व शहरी भागातील पाणी पुरवठ्याच्या नियोजनासंदर्भातील बैठका संबंधित जिल्हयातच घेण्याबाबत**

**(२७) ७२७४ (१६-०४-२०२०). श्री.सुहास (आण्णा) व्दारकानाथ कांदे (नांदगाव) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धरणांमधून शेतीसाठी सोडण्यात येणारी आवर्तने तसेच शहरी भागातील पाणी पुरवठ्याच्या नियोजनासंदर्भातील बैठका आता यापुढे पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली त्या-त्या जिल्हयातच घेण्याचा निर्णय शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विचाराधीन प्रस्तावावर शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील (१६-१२-२०२०) :** (१) नाही. धरणांतून शेतीसाठी पाणी सोडण्यात येणारी आर्वतने सोडणेबाबत जलसंपदा विभागाच्या दिनांक २२.०८.२००० च्या शासन निर्णयान्वये गठित करण्यात आलेल्या कालवे सल्लागार समिती स्थापन केल्यानुसार व शहरी भागातील पाणी पुरवठयाच्याबाबत जलसंपदा विभागाच्या शासन निर्णय दिनांक १७.११.२०१६ च्या शासन

निर्णयान्वये मा.मंत्रीमंडळ उपसमिती गठित करुन कार्यवाही केली जाते.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**आभोळ (ता.अकोले, जि.अहमदनगर) येथील आरोग्य उपकेंद्रांची झालली दुरवस्था**

**(२८) ९६४० (०३-०६-२०२०). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आभोळ (ता.अकोले, जि.अहमदनगर) येथील प्राथामिक आरोग्य उपकेंद्र हे या परिसरातील पैठण, गंभीरवाडी, बुळेवाडी, भावरीवाडी, आंभोळ व त्यांच्या महादेवावाडी या गावासाठी हे आरोग्य उपकेंद्र असून उपकेंद्राच्या इमारतीची झालेली दुरवस्था व अपूर्ण कामामुळे सदरचे केंद्र बंद असल्याचे माहे मार्च, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर आरोग्य उपकेंद्राच्या माध्यामातून आरोग्याशी संबंधीत विविध सर्व्हे, लसीकरण, मधुमेह, कर्करोग, एच.बी. तपासणी, रक्तदान, प्रसूतीकरणे, प्राथमिक उपचार करणे आवश्यक असताना केंद्रच बंद असल्याने या सुविधापासून ग्रामस्थ वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार प्राथमिक आरोग्य केंद्र तात्काळ सुरु करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (३०-१२-२०२०) :** (१) अंशत : खरे आहे.
आंभोळ (ता.अकोले, जि.अहमदनगर) येथील प्राथमिक आरोग्य उपकेंद्र हे या परिसरातील पैठण, गंभीरवाडी, बुळेवाडी, भावरीवाडी, आंभोळ व महादेववाडी या गावांसाठी हे आरोग्य उपकेंद्र असून सन १९८८ साली इमारतीचे बांधकाम करण्यात आलेले आहे. सदरचे आरोग्य उपकेंद्र दिनांक ३० मार्च, २०१८ पासून ब्लॉक टाकणे, दरवाजे, खिडक्या व ड्रेनेज पाईप दुरूस्तीसाठी बंद होते.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) आंभोळ येथील सरपंच व कमीटीने उपकेंद्र दुरूस्तीबाबत पंचनामा करून दिनांक ०१ जानेवारी, २०२० रोजी दुरूस्तीसाठी ताब्यात घेतले होते. दिनांक ३० मार्च, २०१८ ते दिनांक ३० मार्च, २०२० या कालावधीमध्ये आंभोळ उपकेंद्रासाठी अंगणवाडी केंद्र व इतर पर्यायी खाजगी जागा उपलब्ध करून घेऊन उपकेंद्र आंभोळ अंतर्गत गावांना आरोग्य सेवा देण्यात आलेल्या आहेत. सद्यस्थितीत आंभोळ (ता.अकोले, जि.अहमदनगर) येथील प्राथमिक आरोग्य उपकेंद्रामधून आरोग्य सेवा नियमितपणे देण्यात येत आहेत.

---

**कृष्णा खो-याच्या पुरावर उपाययोजना करण्याबाबत**

**(२९) ११४५६ (०८-०९-२०२०). श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्रीमती लताबाई सोनवणे (चोपडा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भीमा उपखो-यातील धरणांत १५ टक्के आणि कृष्णा उपखो-यातील धरणात ३० टक्के असलेला पाणी साठा व जुन महिन्याच्या तीन आठवड्यात झालेली तिप्पट पर्जन्यवृष्टी यामुळे कृष्णा खो-यात यंदाही पुराचा धोका असल्याचे दिनांक २२ जून, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कृष्णा उपखोऱ्यातील धरणाची शासनाने पाहणी केली आहे काय,

(३) असल्यास, कृष्णा खो-याच्या पुरावर उपाययोजना करण्याच्या दृष्टीने कृष्णा-भीमा नदीजोड प्रकल्प सर्वोत्तम पर्याय असल्याने त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील (१६-१२-२०२०) :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) कृष्णा भीमा नदीजोड प्रकल्प ही पूर समस्येवर उपाययोजना ठरणार नाही. असलाच तर अत्यंत मर्यादित परिणाम पुरावर होईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गोदमगांव-कृष्णूर-वजिरगांव (ता.नायगांव जि.नांदेड) या रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत**

**(३०) १२६५७ (०९-०९-२०२०). डॉ.तुषार राठोड (मुखेड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नायगांव (जि. नांदेड) तालुक्यातील गोदमगांव-कृष्णूर-वजिरगांव ते टाकळी पर्यंत २३ कि.मी. रस्त्याचे काम मुख्यमंत्री ग्रामसडक योजना २०१६-१७ अंतर्गत मंजूर करण्यात आलेले असून सदर काम संथ गतीने व निकृष्ट दर्जाचे होत असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१९ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबतची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार संबंधित कंत्राटदार व अधिका-यांवर कारवाई करण्यासह सदरहू रस्त्याचे काम तात्काळ करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (२९-१२-२०२०) :** (१) सदर काम संथ गतीने चालु आहे हे खरे आहे. तथापि सदर काम निकृष्ट दर्जाचे होत नसून कामाचा दर्जा शासनाने ठरवून दिलेल्या मानकाप्रमाणे आहे.

(२) होय, याबाबत शासनाने चौकशी केली आहे.

सदर रस्त्याच्या काही लांबीमध्ये जमिनीचा वाद असल्याने सदर काम हे संथ गतीने झाल्याचे आढळून आले आहे. तसेच मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेच्या प्रचलित धोरणानुसार सदर कामाचा दर्जा राज्य गुणवत्ता निरिक्षक यांचेकडून वेळोवेळी तपासला असून त्यांनी कामास समाधानकारक शेरा दिला आहे.

(३) व (४) सदर कामाच्या विलंबासाठी संबंधित कंत्राटदारावर प्रति दिवस रू.१०००/- नुकसान भरपाई आकारण्यात आली आहे. मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेच्या निकषाप्रमाणे सदर काम माहे डिसेंबर २०२० पर्यंत पुर्ण करण्याचे नियोजन आहे.

---

**लातूर जिल्हयामधील अंगणवाडीतील रिक्त पदे भरण्याबाबत**

**(३१) १२६८८ (०८-०९-२०२०). श्री.अभिमन्यु पवार (औसा) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर जिल्हयातील अंगणवाडी मदतनीस व अंगणवाडी कार्यकर्ती यांची पदे रिक्त असून नवीन अंगणवाडी वर्गास मान्यता देणे शासनाने बंद केले असल्याचे माहे मे-जून, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, व चौकशीत काय आढळून आले,

(३) असल्यास, त्यानुसार सदरील रिक्त पदे भरण्याबाबत व नवीन अंगणवाडी वर्गास मान्यता देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) (०४-०१-२०२१) :** (१) (२) व (३) हे अंशत: खरे आहे.

अंगणवाडी सेविका, मदतनीस, मिनी अंगणवाडी सेविका यांचे रिक्त पदांपैकी ५० % रिक्त पदे भरण्यास महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र.एबावि-२०१८/प्र.क्र.२२३/का-०६ दि.१७/०१/२०२० अन्वये मान्यता देण्यात आली आहे. तसेच महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र.एबावि-२०१९/प्र.क्र.३०५/का-०६ दि.१७/०१/२०२० अन्वये देण्यात आलेल्या मान्यतेच्या अनुषंगाने लातूर जिल्हयात ११ मिनी अंगणवाडी केंद्रांना सुरु करण्यास व तेथील रिक्त पदे भरण्यास मंजुरी देण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**संग्रामपूर व जळगाव जामोद (जि.बुलढाणा) या दोन तालुक्यांमध्ये कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव नियंत्रित करण्यासाठी प्राप्त झालेल्या निधीबाबत**

**(३२) १२९८९ (०९-०९-२०२०). डॉ.संजय कुटे (जळगाव जामोद) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संग्रामपूर व जळगाव जामोद (जि.बुलढाणा) या दोन तालुक्यांमध्ये करोना विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्याकरीता उपाययोजना करण्यासाठी १५ लाख निधीची तरतूद करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू निधी तालुक्यांना प्राप्त झाला आहे काय,

(३) असल्यास, प्राप्त निधी कशा प्रकारे वितरित करण्यात आला आहे व सदर तालुक्यात कोणकोणत्या उपाययोजना केल्या आहेत,
(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. अजित पवार (२४-१२-२०२०) :** (१) ते (४) कोविड-१९ विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी उपाययोजना करण्याकरीता तालुकास्तरावर निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला नसून जिल्हास्तरावर निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.
कोविड-१९ चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी बुलडाणा जिल्हयास रुपये १७५०.९७ लक्ष इतका निधी प्राप्त झालेला आहे.

---

**येवदा ते इटकी (ता. दर्यापूर, जि. अमरावती) रस्त्याची दुरूस्ती करणेबाबत**

**(३३) १२९९९ (१६-०७-२०२०). श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) येवदा ते इटकी (ता.दर्यापूर, जि. अमरावती) रस्त्याची दुरवस्था झालेली असल्याने वाहनधारकांना तसेच शेतकऱ्यांना वाहतूक करताना मोठया प्रमाणात अडचणी येत असल्याचे माहे जून, २०२० मध्ये वा दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्त्याची तातडीने दुरूस्ती करण्याबाबत शेतकऱ्यांकडून वारंवार मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर रस्त्याची दुरूस्ती करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (४-१-२०२१) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) येवदा ते इटकी रस्ता हा ग्रामीण मार्ग १३९ असून सद्यस्थितीत पाणंद रस्ता आहे. रस्त्याचे बांधकाम करण्याकरिता तयार केलेल्या प्राधान्य क्रमाच्या नियोजनामध्ये सदर रस्त्याचा अनुक्रमांक ८ असून सद्यस्थितीत रस्त्याची रुंदी २० ते २५ फूट असून रस्त्याच्या बांधकामाकरिता ४० फूट रुंदीची आवश्यकता आहे. अतिरिक्त आवश्यक असलेल्या जागेसाठी दोन्ही बाजूच्या शेतक-यांचे जमिनीबाबतचे दानपत्र आवश्यक आहे. ग्रामीण मार्गाकरिता भूसंपादन प्रक्रिया करता येत नसल्याने दोन्ही बाजूच्या शेतक-यांकडून जमिनी उपलब्ध करुन दिल्यास शासनाकडून अथवा जिल्हा नियोजन समितीमार्फत प्राप्त होणा-या निधीच्या उपलब्धतेनुसार सदर काम प्राधान्याने करण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजा अतोरा, जोलवाडी देलवाडी व अंबिकापुर (ता. आष्टी, जि. वर्धा) येथे रस्त्यासाठी जमिन संपादित करण्यासाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबत**

**(३४) १३०२७ (१७-०७-२०२०). श्री.दादाराव केचे (आर्वी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजा देलवाडी, जोलवाडी, अंबिकापूर व अंतोरा (ता. आष्टी, जि. वर्धा) येथील रस्ता बांधकामाकरिता भुसंपादनाची प्रकरणे विशेष भुसंपादन अधिकारी सामान्य वर्धा यांच्याकडे सादर करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विशेष भुसंपान अधिकारी, सामान्य वर्धा यांनी गावनिहाय भुसंपादन जमिनीची रक्कम रू. २,६६,०००/- भरण्याचे कळविले होते व त्यानुसार पत्र क्र. जिपव/बांध/प्रआ९५३/०६ दिनांक २८ जून, २००६ विशेष भुसंपादन अधिकारी, सामान्य वर्धा यांना पाठविली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपजिल्हाधिकारी, भुसंपादन वि.पा.वि.म.वर्धा कार्यालयाकडून प्रकरण क्र. ११७/२०१७-१८, ११८/१७-१८, ११९/१७-१८, १२०/१७-१८ मध्ये रस्त्यासाठी संपादित केलेल्या जमिनीचा सुधारित मुल्यांकनानुसार जमिन धारकांना द्यावयाचा मोबदला रु. १,०६,२९,५०२/-देणे आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर भुसंपादनकरिता निधी ३०५४-२४१९ ग्रामिण मार्ग व पुल रस्ते या कार्यक्रमातंर्गत उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (४-१-२०२१) :** (१), (२) व (३) हे खरे आहे.

(४) व (५) लेखाशिर्ष ३०५४-२४१९ रस्ते व पुल दुरुस्ती परिरक्षण कार्यक्रम या योजनेमध्ये जिल्हा परिषदांच्या अखत्यारीतील ग्रामीण मार्ग व इतर जिल्हा मार्ग यांची देखभाल व दुरुस्ती करण्यात येते. सदर योजनेमधून ग्रामीण रस्त्याच्या भूसंपादन करिता मोबदला देण्याबाबतची कोणतीही तरतूद नाही. ग्रामीण रस्त्याचा काही भाग खाजगी जागेमधून जात असल्यास सदर खाजगी जागेमधून रस्त्याचे काम करण्यास संबंधित मालक स्वखुषीने खाजगी जागा रस्त्याकरिता देण्यास तयार असल्यासच सदर रस्त्याचे काम करण्यात येते.

---

**जिंतूर (जि.परभणी) तालुक्यातील अंगणवाडीमधील रिक्त पदे भरण्याबाबत**

**(३५) १३४६० (१४-०९-२०२०). श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिंतूर (जि.परभणी) तालुक्यातील अंगणवाडी मध्ये अंगणवाडी सेविका, मिनी अंगणवाडी सेविका, मदतनीस अशी ३९ पदे रिक्त असल्याचे माहे जुलै, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रिक्त पदे भरण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) (०४-०१-२०२१) :** (१) होय हे खरे आहे.
(२) जिंतूर तालुक्यात ३१६ अंगणवाडी केंद्र कार्यरत आहेत त्यापैकी अंगणवाडी सेविका-१८, मिनी अंगणवाडी सेविका-०४, व अंगणवाडी मदतनीस-१७ अशी एकूण ३९ पदे रिक्त आहेत.

अंगणवाडी सेविका, मदतनीस, मिनी अंगणवाडी सेविका यांचे रिक्त पदांपैकी ५० % रिक्त पदे भरण्यास शासन निर्णय दि.१७/०१/२०२० अन्वये मान्यता देण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील मराठा समाजासाठी एस.ई.बी.सी. आरक्षणाच्या जागा निश्चित करणेबाबत**

**(३६) १४३४८ (२२-०९-२०२०). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील मराठा समाजासाठी एस.ई.बी.सी. आरक्षण लागु करण्यासाठी माहे जुलै, २०१९ मध्ये वा त्या दरम्यान शासनाने अध्यादेश जारी केला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, एस.ई.बी.सी. आरक्षण लागु करतांना सन २०१९ मधील खाजगी वैद्यकीय महाविद्यालयाच्या प्रवेश प्रक्रीयेमध्ये गोंधळ झाल्यामुळे विद्यार्थ्यांच्या पालकांना न्यायालयात जावे लागले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यात इतर प्रवर्गाप्रमाणे एस.ई.बी.सी. प्रवर्गाच्या जागा निश्चित कराव्यात अशी मागणी पालक वर्गाने शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त अध्यादेशाप्रमाणे निर्गमीत शासन निर्णयातील त्रुटी दुर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अमित विलासराव देशमुख (११-१२-२०२०)** (१) वैद्यकीय अभ्यासक्रम प्रवेश प्रक्रियेच्या अनुषंगाने कायद्यामध्ये सुधारणा करण्यासाठी दिनांक २०/०५/२०१९ रोजी अध्यादेश जारी करण्यात आला होता.
तसेच, महाराष्ट्र राज्य सामाजिक आणि शैक्षणिक मागास (एसईबीसी) वर्गाकरिता (राज्यातील शैक्षणिक संस्थांमधील जागांच्या प्रवेशाचे आणि राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसंवांमधील नियुक्त्यांचे किंवा पदांचे) आरक्षण (सुधारणा) अधिनियम २०१९, दिनांक ०३/०७/२०१९ रोजी राजपत्रात प्रसिध्द करण्यात आला असून त्यानुसार एसईबीसीसाठी राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवांमधील आणि पदांवरील सरळसेवा प्रवेशासाठी १३ टक्के व शैक्षणिक संस्थांमध्ये १२ टक्के आरक्षण लागू करण्यात आलेले आहे.
(२) सन २०१९-२० च्या वैद्यकीय प्रवेश प्रक्रियेदरम्यान मा.उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ यांनी रिट याचिका क्रमांक २७८०/२०१९ व इतर याचिकांमध्ये दिनांक ०२/०५/२०१९ रोजी पारित केलेल्या आदेशांनुसार उक्त प्रवेश प्रक्रियेत एसईबीसी आरक्षण लागू राहणार नाही, असा निकाल दिला होता. त्यानंतर शासनामार्फत मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल याचिकेवरील दिनांक ०९/०५/२०१९ व दिनांक १७/०५/२०१९ रोजीच्या निर्णयानंतर राज्य शासनाने दिनांक २०/०५/२०१९ रोजी अध्यादेश जारी करुन कायद्यात सुधारणा केली होती.
तद्‌नंतर मा.उच्च न्यायालयाने दिनांक २७/०६/२०१९ रोजी दिलेल्या आदेशानुसार राजपत्रान्वये दिनांक ०३/०७/२०१९ रोजी एसईबीसी आरक्षण शिक्षणाकरिता १६ टक्के वरुन १२ टक्के अशी

सुधारणा केली आहे. परंतू, सदरची सुधारणाही नीट-पीजी-२०१९-२० व नीट-एमडीएस २०१९-२० ची प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर प्रसिध्द झाल्याने सन २०१९-२० च्या पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रवेशाकरिता एसईबीसी आरक्षण १६ टक्के प्रमाणे लागू करण्यात आले होते.
(३) व (४) एसईबीसी प्रवर्गाच्या जागा हया कायद्यातील तरतूदीनुसार निश्चित करण्यात येतात. दिनांक २०/०५/२०१९ रोजी जारी अध्यादेशातील तरतूदीनुसार सन २०१९-२० ची वैद्यकीय पदवी अभ्यासक्रम प्रवेश प्रक्रिया पार पाडण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे वाघरे (ता.पारोळा जि.जळगांव) ग्रामपंचायतीत**
**प्रधानमंत्री आवास योजनेत झालेला गैरव्यवहार**

**(३७) १४४०८ (११-०९-२०२०). श्री.चिमणराव पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :
(१) मौजे-वाघरे (ता.पारोळा, जि.जळगाव) ग्रामपंचायतीत प्रधानमंत्री आवास योजनेत झालेल्या गैरव्यवहाराची चौकशी करण्याकरीता गट विकास अधिकारी, पंचायत समिती, चाळीसगांव, जि.जळगांव यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती नेमण्यात आली होती त्यानुसार सदर प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणाची सुरु असलेली चौकशी पूर्ण होऊन शासनास अहवाल सादर करण्यात आला आहे काय,
(३) असल्यास, चौकशी अहवालात काय आढळून आले आहे व त्यानुषंगाने दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (१७-१२-२०२०)** (१) होय.
(२) होय, चौकशी पूर्ण झालेली आहे. तथापि अहवाल शासनास सादर झालेला नाही.
(३) प्रस्तुत प्रकरणी सकृतदर्शनी अनियमितता आढळून आल्याने संबंधित ग्रामसेवकांची एक वेतनवाढ तात्पुरत्या स्वरुपात बंद करण्याची कारवाई करण्यात आलेली आहे व तत्कालीन सरपंच यांना नोटीस बजाविण्यात आली असून खुलासा मागविण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**तिरोडा (जि.गोदिंया) तालुक्यातील गराडा ठाणेगांव ते सुकळी डकराम या रस्त्याचे**
**बांधकाम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत**

**(३८) १४५८९ (११-०९-२०२०). श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव), श्री.राजू कारेमोरे (तुमसर), श्री.इंद्रनिल नाईक (पुसद) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तिरोडा (जि.गोदिंया) तालुक्यातील गराडा ठाणेगांव ते सुकळी डकराम या मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतंर्गत रस्त्याचे बांधकाम कंत्राटदाराने संबंधित विभागाचे अधिकारी व संबंधित

रस्त्याची देखरेख करणारे कनिष्ठ अभियंता, उपविभागिय अभियंता यांच्याशी संगनमत करुन निकृष्ट दर्जाचे केले असल्याचे माहे फेब्रुवारी-एप्रिल-२०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रस्त्याच्या दुसऱ्या स्टेजची पिचींग करतांना निकृष्ट दर्जाचे डांबर वापरण्यात आल्याची तक्रार गांवकऱ्यांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार संबंधित अधिकाऱ्यांवर व कंत्राटदारावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (२९-१२-२०२०) :** (१) व (२) हे खरे नाही.

सदर रस्त्याच्या दुसऱ्या स्टेजची पिचींग करतांना निकृष्ट दर्जाचे डांबर वापरल्याची गांवकऱ्यांनी केलेली तक्रार आढळून आली नाही.

मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेच्या प्रचलित धोरणानुसार सदर कामाची तपासणी राज्य गुणवत्ता निरिक्षक यांनी केली असून त्यांनी कामास समाधानकारक शेरा दिला आहे.

सद्यस्थितीत रस्त्याचे काम पुर्ण झाले रस्ता असून वाहतुकीस सुयोग्य आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## लातूर जिल्हयात प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत लाभार्थ्यांचे आधार सीडिंगसह संमतीपत्र भरणे प्रलंबित असल्याबाबत

**(३९) १४६२८ (११-०९-२०२०). श्री.अभिमन्यु पवार (औसा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत आवास प्लस मध्ये नोंद करण्यात आलेल्या कुटुंब प्रमुख कटुंब प्रमुख व सदस्यांचे संमती पत्र आणि त्यांचे आधार सीडिंग दि.३१ जुलै २०२० पर्यंत पूर्ण करण्याबाबत प्रकल्प संचालक जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा लातूर यांनी अ.शा.पत्र.क्र.जिग्रावियंला/प्रमंआयोग्रा/प्र.क्र./कावि-७३७/२० दि.२३/०७/२०२० नुसार लातूर जिल्हयातील सर्व गटविकास अधिकारी यांना पत्राद्वारे निर्देशित केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पत्राच्या अनुषंगाने लातूर जिल्हयात सदर योजनेंतर्गत तालुकानिहाय किती कुटुंबाचे आवास योजनेंतर्गत आवास प्लस मध्ये नोंद करण्यात आलेली आहे व त्यापैकी किती लाभार्थ्यांचे आधार सीडिंग सह संमती पत्र भरणे शिल्लक राहिलेले आहे तसेच सदरील आदेशानुसार गटविकास अधिकारी यांनी कोणती कार्यवाही केली आहे,

(३) असल्यास, सदर लाभार्थ्यांचे आधार सीडिंग सह संमती पत्र भरण्यास विलंब करणाऱ्या दोषींवर कारवाई करुन सदरील माहिती पुनश्च सादर करणेबाब शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (१७-१२-२०२०)** (१) होय, हे खरे आहे.

(२) लातूर जिल्ह्यातील तालुकानिहाय आवास प्लस मध्ये नोंद घेण्यात आलेल्या कुटुंबाच्या संख्याबबतचे तपशील

| तालुका | कुटुंब प्रमुखाचे एकूण उद्दीष्ट | साध्य | टक्केवारी | कुटुंब सदस्यांचे एकूण उद्दीष्ट | साध्य | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| अहमदपूर | १५३१० | १४७९५ | ९६.६४ | २००८१ | १७४२४ | ८६.७७ |
| औसा | १५८३५ | १५२८४ | ९६.५२ | २७३५१ | २२११७ | ८०.८६ |
| चाकूर | १७०८२ | १६९७२ | ९९.३६ | ३५३६२ | २८९८४ | ८१.९६ |
| देवणी | ५९९१ | ५८२५ | ९७.२३ | ५९८९ | ५१३६ | ८५.७६ |
| जळकोट | ८५२३ | ८२३२ | ९६.५९ | १७८२३ | १४१०५ | ७९.१४ |
| लातूर | २०५४० | १९७१६ | ९५.९९ | ४१९७६ | ३३५६८ | ७९.९७ |
| निलंगा | २६४८२ | २५६५९ | ९६.८९ | ५२७३८ | ४३९८८ | ८३.४१ |
| रेणापूर | १६६९३ | १६११ | ९६.८१ | २२७५७ | १६६०४ | ७२.९६ |
| शिरुर अ. | ८२९६ | ८०८९ | ९७.५० | १४५६३ | ११०२८ | ७५.७३ |
| उद्‌गीर | १७३२७ | १६६४० | ९६.०४ | ३३१५३ | २४६९० | ७४.१७ |
| एकूण | १५२०७९ | १४७३७३ | ९६.९१ | २७१७९३ | २१७६४४ | ८०.०८ |

तांत्रिक अडचणी व राज्यातील मोठ्या प्रमाणात असणारी कुटुंब संख्या यामुळे आधार सिडींगचे कामास जास्त कालावधी लागत असल्याने सदर कामास ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार यांनी दि.५.११.२०२० पर्यन्त मुदतवाढ दिली आहे. सदर कालावधीमध्ये उर्वरित आधार सिडींगचे काम पूर्ण करण्याबाबत सर्व जिल्ह्यांना संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष ग्रामीण गृहनिर्माण यांच्यामार्फत कळविण्यात आले आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**बीड जिल्ह्यातील रद्द केलेल्या रस्त्यांची कामे सुरु करणेबाबत**

**(४०) १४६३२ (११-०९-२०२०). श्री.लक्ष्मण पवार (गेवराई) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्ह्यातील मुख्यमंत्री ग्राम सडक योजने अंतर्गत २०१९ मध्ये मंजूर झालेल्या ८२ ग्रामीण रस्त्यांपैकी जिल्ह्यातील केवळ दोन विधानसभा मतदारसंघातील प्रशासकीय व तांत्रिक मान्यतेसह टेंडर काढण्यात आलेली चौतीस ग्रामीण रस्त्याची कामे कारण नसताना रद्द केली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्थानिक लोकप्रतिनिधींनी मुख्य अभियंता, मुख्यमंत्री ग्राम सडक योजना, पुणे यांना लेखी निवेदनाद्वारे रद्द केलेल्या रस्त्याची दुरवस्था झाली असून माहे मार्च, २०२० मध्ये शासनाने सदर रस्त्याची कामे रद्द करण्याचा घेतलेला निर्णय रद्द करून सदर रस्त्यांची कामे सुरू करण्याचे कळविले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (२९-१२-२०२०) :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) व (४) निधीचा असमतोल वाटप तसेच कोरोनाच्या संकटामुळे वित्त विभागाने निधी देणेबाबत काही मर्यादा घातलेल्या आहेत. निधी उपलब्ध होताच लोकप्रतिनिधींनी सुचविलेली कामे घेण्याचा विभागाचा मानस आहे, असे शासनाच्या दि.१६.०७.२०२० व दि.२३.०७.२०२० रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

---

## बीड तालुक्यातील मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत राष्ट्रीय महामार्ग २११ ते कुमशी-सौदाना या रस्त्याच्या कामाबाबत

**(४१) १४६३३ (११-०९-२०२०). श्री.लक्ष्मण पवार (गेवराई) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बीड तालुक्यातील मुख्यमंत्री ग्राम सडक योजने अंतर्गत राष्ट्रीय महामार्ग २११ ते कुमशी-सौदाना या रस्त्याचे काम साई यश कन्स्ट्रक्शन, औरंगाबाद करत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्त्यावर होत असलेले नळकांडी पुलाचे काम सोलींग व पीसीसी न करता केवळ नळ्या टाकून अत्यंत निकृष्ट दर्जाचे केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास स्थानिक लोकप्रतिनिधींनी कार्यकारी अभियंता, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना, बीड यांना लेखी निवेदनाद्वारे सदर पुलाचे काम निकृष्ट दर्जाचे होत असल्याची तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार सदर रस्त्यावरील पुलाचे निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्या श्री साई यश कन्स्ट्रक्शन, औरंगाबाद यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (२९-१२-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) हे अंशत: खरे आहे.
संबंधीत ठेकेदाराकडून सदर पुलाच्या नळकांडी काढुन त्याखाली सोलींग व पी.सी.सी. करून काम पुन्हा करण्यात आलेले आहे.
(४) संबंधीत ठेकेदाराकडून सदर नळकांडी पुलाचे काम सोलींग व पी.सी.सी. करून पुन्हा करून घेण्यात आलेले आहे. सदर कामाची राज्य गुणवत्ता निरिक्षक यांनी तपासणी केली असून

त्यांनी काम समाधानकारक असल्याचा शेरा दिला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे तपोवन (ता. मंगरूळपीर, जि. वाशिम) येथील शेततळयाचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत**

**(४२) १४८६७ (२०-१०-२०२०). श्री.प्रशांत बंब (गंगापूर) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे तपोवन (ता. मंगरूळपीर, जि. वाशिम) येथे अतिरिक्त जलसाठा व्हावा म्हणून शासनाने शेततळे मंजूर करून सन २०१८ - २०१९ मध्ये सदरहू शेततळे कृषी विभागाच्या माध्यमातून कंत्राटदाराकडुन खोदण्यात आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त शेततळ्यात जलसाठा होत नसल्याचे जिल्हा कृषी अधीक्षक, वाशिम यांच्या दिनांक १४ जुलै, २०२० व १६ सप्टेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आणून दिले असुन शेततळयाचे खोदकाम करताना संबंधित ठेकेदार व कृषी सहाय्यक यांनी या स्थळाची पाहणी केली आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्याअनुषंगाने तपोवन येथील शेततळयात जलसाठा होत नसल्यामुळे संबंधित सक्षम अधिकाऱ्यांकडुन तपासणी करुन काम पुन्हा सुरु करण्यासह शेततळयाचे निष्कृष्ट दर्जाचे काम करणाऱ्या कंत्राटदारावर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शंकरराव गडाख (१८-१२-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) मौजे तपोवन येथील शेततळ्याचे काम सुरू करण्यापूर्वी कृषी सहाय्यक, कृषी पर्यवेक्षक व मंडळ कृषी अधिकारी, शेलुबाजार यांनी पाहणी करून कामाची आखणी करून दिली होती. तसेच संबंधित कंत्राटदारास कामाबाबत सूचना दिल्या होत्या.
(३) याप्रकरणी तालुका कृषी अधिकारी, मंगरूळपीर यांनी शेततळ्यास प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली असून शेततळ्याची जागा योग्य असून शेततळ्यात पाणीसाठा दिसून आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मासवण ते नागझरी (ता.जि.पालघर) रस्त्याचे काम अपूर्णावस्थेत असल्याबाबत**

**(४३) १६५२६ (२८-१२-२०२०). श्री.राजेश पाटील (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री. हितेंद्र ठाकूर (वसई) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मासवण ते नागझरी (ता.जि.पालघर) या ८ कि.मी. रस्त्याचे काम सन २०१६ मध्ये मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून मंजूर झाले असून रस्त्याला ५ कोटी ८५ लक्ष निधी उपलब्ध होवूनही रस्त्याचे काम अपुर्णावस्थेत असून निकृष्ट दर्जाचे करण्यात आल्याचे स्थानिक

लोकप्रतिनिधीनी दिनांक ३ ऑक्टोबर, २०२० रोजी वा त्यासुमारास पत्राद्वारे मा. सार्वजनिक बांधकाम मंत्री यांच्या निदर्शनास आणले आहे,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, त्यानुसार सदर अपूर्ण रस्ता तात्काळ पूर्ण करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (२९-१२-२०२०) :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेच्या प्रचलीत धोरणानुसार सदर रस्त्याच्या कामाची वेळोवेळी ४ SQM व १ SSQM यांनी तपासणी केली असून त्यांनी सदर कामास समाधानकारक शेरा दिला आहे. सदर कामाची तक्रार प्राप्त झाल्यानंतर सदर रस्त्याची पुन्हा सखोल तपासणी करण्यात आली असून त्यांनी काम समाधानकारक असल्याचा शेरा दिला आहे. व सदर रस्त्यावरून वाळू तसेच Crushed Metal व Rubble ची वाहतूक होत असल्याने सदर रस्त्याचा डांबरी पृष्ठभाग खराब होत असल्याबाबत निरिक्षण नोंदविलेले आहे.

(३) सदर मुख्य रस्त्याचे डांबरीकरणाचे काम व उपलब्ध जागेत साईड पट्टीचे काम पुर्ण झालेले आहे. सदर रस्त्याच्या खराब झालेल्या लांबीत ठेकेदाराकडून दुरूस्तीचे काम प्रगतीत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जिंतूर (जि.परभणी) तालुक्यात मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत मानधनी ते झुणझुणवाडी व जोगवाडा- सोस- सावरगाव -कवडा या रस्त्यांचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत

**(४४) १६६७५ (२१-११-२०२०). श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिंतूर (जि.परभणी) तालुक्यात मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत मानधनी ते झुणझुणवाडी हा ४ किलोमीटर रस्ता व जोगवाडा- सोस- सावरगाव -कवडा या ११ किलोमीटर रस्त्यांचे काम निकृष्ट दर्जाचे झालेले असल्याचे माहे सप्टेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर डांबरी रस्त्यांच्या मजबुतीकरणासाठी काळ्या मातीचा वापर केला असून २ महिन्यांपूर्वीच केलेल्या या रस्त्यांची दुरवस्था झाली असताना संबंधित अधिकारी व कंत्राटदार रस्त्यांच्या देखभालीकडे दुर्लक्ष करत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार दोषी अधिकारी व कंत्राटदारांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (२९-१२-२०२०) :** (१) हे अंशत: खरे आहे. सदर रस्त्याच्या कामाबाबत तक्रार प्राप्त झाली आहे.

(२) हे खरे नाही. सदर कामाची वेळोवेळी ५ राज्य गुणवत्ता निरिक्षक व १ वरिष्ठ राज्य गुणवत्ता निरिक्षक यांच्या मार्फत तपासणी झाली असून त्यांनी सदर कामास समाधानकारक शेरा दिला आहे.

(३) सदर रस्त्याच्या कामाबाबत प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने राज्य गुणवत्ता निरिक्षक यांनी सदर कामाची पाहणी केली असून त्यांचा अहवाल अद्याप अप्राप्त आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोक ते कोडेगाव (ता.जिंतूर,जि.परभणी) या रस्त्याची झालेली दुरवस्था

**(४५) १६६८० (२१-११-२०२०). श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत कोक ते कोडेगाव (ता. जिंतूर, जि.परभणी) रस्त्याचे काम पूर्ण झाल्यानंतर आठ ते दहा महिन्यातच या रस्त्याची दुरवस्था झाली असून मोठ्या प्रमाणात खड्डे पडले असल्याने अपघात होत असल्याचे दिनांक ३ जून, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हाधिकारी, परभणी यांनी निकृष्ट दर्जाच्या कामाची राज्य गुणवत्ता समन्वयक (प्रमंग्रासयो), पुणे यांना चौकशी करण्याबाबत कळविले असुन राज्य गुणवत्ता समन्वयक यांचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर अहवालाच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, सदर अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय, त्याचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार संबंधित दोषी अधिकारी व कंत्राटदार यांच्यावर कारवाई करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (३०-१२-२०२०) :** (१) हे अंशत: खरे आहे.

कोक दुधगांव रस्त्याच्या एकुण १६.८० कि.मी. लांबीपैकी २.५० कि.मी. रस्ता अतिजड वाहतुकीमुळे खराब झाला आहे.

(२) होय हे खरे आहे.

(३) सदर तक्रारीच्या अनुषंगाने राज्य गुणवत्ता निरिक्षक यांनी सदर कामाची पाहणी केली असून त्यांचा अहवाल अद्याप अप्राप्त आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई उपनगरातील महाकाली गुंफा, जोगेश्वरी गुंफा व कान्हेरी गुंफेचे सौदर्यीकरण करणेबाबत**

**(४६) १८२१६ (२६-११-२०२०). श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व), श्री.रमेश लटके (अंधेरी पूर्व), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगरातील जोगेश्वरी येथील महाकाली गुंफा, जोगेश्वरी गुंफा व कान्हेरी गुंफा या प्राचीनकालीन पुरातन वास्तु असून सद्य:स्थितीत या सर्व गुंफांची व आजुबाजुच्या परिसराची दुरवस्था झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या गुंफा व परिसराचे सौंदर्यीकरण करून पर्यटकांकरिता सोई-सुविधा उपलब्ध करून दिल्यास येथे पर्यटकांच्या संख्येत वाढ होवून शासनाच्या महसूलात वाढ होईल, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर गुंफाचे सौंदर्यीकरण तसेच पर्यटकांकरिता आवश्यक सोई-सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री महोदयांना माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निवेदन सादर केले होते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त निवेदनाच्या अनुषंगाने सर्व गुंफांचे सौंदर्यीकरण व पर्यटकांकरिता सोई सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अमित विलासराव देशमुख (२२-१२-२०२०) :** (१) व (२) महाकाली गुंफा, जोगेश्वरी गुंफा व कान्हेरी गुंफा या राष्ट्रीय संरक्षित स्मारक आहेत. त्या केंद्र शासनाच्या अखत्यारीत असल्याने त्यांच्या जतन दुरूस्तीची बाब भारतीय पुरातत्व सर्वेक्षण यांच्याकडून हाताळण्यात येते. या गुंफा अतिप्राचीन असल्याने काळानुसार व वातावरणीय बदलामुळे हानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे यांची नियमित देखभाल निधी उपलब्धेतेनुसार भारतीय पुरातत्व सर्वेक्षण यांच्याकडून करण्यात येते. तसेच पर्यटकांकरीता प्रसाधन गृह, सूचना फलक, पथ-मार्ग इत्यादी सोई सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहे.
(३) हे खरे आहे.
(४) भारतीय पुरातत्व सर्वेक्षण यांच्यामार्फत पर्यटकांकरीता प्रसाधन गृह, सूचना फलक, पथ-मार्ग इत्यादी सोई सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहे. तसेच भारतीय पुरातत्व सर्वेक्षण यांच्यामार्फत पर्यटकांकरिता माहितीपुस्तक व माहिती पत्रकाचे नि:शुल्क वितरण केले जाते.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोरची ते जांभळी (ता.कोरची, जि.गडचिरोली) रस्त्याच्या कामास निधी उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(४७) १८५८७ (२१-११-२०२०). श्री.कृष्णा गजबे (आरमोरी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरची ते जांभळी (ता.कोरची, जि.गडचिरोली) रस्ता मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतुन सन २०१९ मध्ये मंजुर करण्यात आलेला असून सदर कामाची निवीदा प्रक्रिया पुर्ण होवुनही निधीच्या उपलब्धते अभावी रस्त्याचे काम सुरु झालेले नसल्याचे माहे ऑक्टोबर,

२०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त रस्त्याअभावी नागरीकांना रहदारीस होत असलेल्या गैरसोयीमुळे नागरीकांनी रस्त्याचे काम तात्काळ सुरु करण्याची स्थानिक प्रशासनाकडे मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू रस्त्याच्या कामास निधी उपलब्ध करुन देण्यासह रस्त्याचे काम तात्काळ सुरु करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (३०-१२-२०२०) :** (१) हे खरे नाही.
सदर काम निधि अभावी रखडले नसून नक्षलग्रस्त भागातील असल्यामुळे रखडले आहे.
(२) सदर निवेदन दिल्याचे आढळून आले नाही. तथापि सद्यस्थितीत सदरचे काम प्रगतीपथावर आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मुंबईतील हाफकीन बायोफार्मा संस्थेस खाजगी कंत्राटदारांकडून विहित मुदतीत व्हेंटिलेटरचा पुरवठा न झाल्याबाबत

**(४८) १८७७८ (२६-११-२०२०). श्रीमती सरोज आहिरे (देवळाली), श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव), श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील साथीच्या आजाराचा वाढता प्रार्दूभाव लक्षांत घेऊन कोव्हिड-१९ साठी तसेच आरोग्य यंत्रणेमधील अपुऱ्या व्हेंटिलेटरचा तुटवडा लक्षांत घेऊन मुंबईतील हाफकिन बायोफार्मा संस्थेने दिनांक २१ मार्च, २०२० रोजी वा त्यासुमारास १५० व्हेंटिलेटरचा पुरवठा करण्याचे कंत्राट एका खासगी कंपनीला दिले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कंपनीने शासनासमवेत केलेल्या करारानुसार व्हेंटिलेटर्स १५ दिवसात पुरविणे अपेक्षित असताना त्यापैकी फक्त ४० व्हेंटिलेटर पुरविले असल्याचे दिनाक २४ जुलै, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबतचे १७ कोटी २२ लाख रुपयांचे कंत्राट सदर कंपनीस देताना कंपनीसोबत झालेल्या करारानुसार कंपनीने सात दिवसात अनामत आणि प्रासंगिक असे ७७ लाख ४९ हजार रुपये बँक गॅरंटीच्या स्वरुपात द्यावयाचे असतांना हाफकीन बायोफार्माने अशी कोणतीही अनामत ठेव कंपनीकडून घेतली नसल्याचे माहे जुलै, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, केलेल्या करारानाम्यानुसार विहित कालावधीत व्हेंटिलेटर्स पुरविण्यात न आल्यामुळे सदर कंपनीविरुध्द कोणती दंडात्मक कारवाई करण्यांत आली तसेच अनामत ठेव रक्कम न घेताच कंपनीला कंत्राटाची पूर्ण रक्कम कोणत्या आधारे अदा करण्यांत आली याबाबत शासनाकडून चौकशी करण्यांत आली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीतून काय निष्पन्न झाले व त्यानुसार याप्रकरणी शासनाने पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अमित विलासराव देशमुख (१५-१२-२०२०) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) हे खरे नाही.
(४) पुरवठादाराने पुरवठा सुरु केला असून व्हेंटिलेटरची आवश्यकता असल्यामुळे व कोव्हीड उद्रेकामुळे उत्पादन व दळणवळण नसल्यामुळे पुरवठ्यामध्ये खंड झाला होता. निविदेतील अटी व शर्तीनुसार पुरवठादारास पुर्ण रक्कम अदा करण्यात आली नसुन पुरवठा केलेल्या व्हेंटिलेटरच्या देयकामधून विलंब आकार आकारणी करण्यात आली आहे. निविदेतील अटी व शर्तीनुसार दंड आकारणी केली नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

### नायगाव(खै.) (जि.नांदेड) तालुक्यात मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत रस्त्यांची कामे निकृष्ट दर्जाची झाल्याबाबत

**(४९) १९५२० (२१-११-२०२०). श्री.राजेश पवार (नायगांव) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नायगाव (खै.) (जि.नांदेड) तालुक्यात मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतंर्गत झालेली एम.डी.आर.-८५ ते हंगरगा, एम.डी.आर.-८५ ते परडवाडी व नरंगल ते अंचोलीची रस्त्याची कामे निकृष्ट दर्जाची झाली असुन सदरहू कामे अपुर्ण अवस्थेत असल्याचे माहे नोव्हेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(३) असल्यास, त्यानुसार सदर रस्त्यांची कामे पूर्ण करण्यासह निकृष्ट दर्जाची काम करणाऱ्या कंत्राटदारावर कारवाई करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (२९-१२-२०२०) :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.
मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेच्या प्रचलीत धोरणानुसार सदर सर्व रस्त्यांची तपासणी राज्य गुणवत्ता निरिक्षक यांनी केली आहे. तपासणी अंति एम.डी.आर.-८५ ते हंगरगाव व एम.डी.आर.-८५ ते परडवाडी या कामांवर राज्य गुणवत्ता निरिक्षक यांनी समाधानकारक पण सुधारणा करणे आवश्यक SRI असा शेरा दिला आहे. त्यानुसार कामात सुधारणा करणे प्रगतीत आहे. तसेच नरंगल ते अंचोली या कामास राज्य गुणवत्ता निरिक्षक यांनी तपासणी अंति समाधानकारक

शेरा दिला आहे.
कोविड-१९ ची टाळेबंदी (Lockdown), यावर्षी झालेला जास्तीचा पाऊस, निधीची अपूरी उपलब्धता व सदर कालावधीत गावकऱ्यांनी केलेल्या विरोधामुळे कामाची गती मंदावली आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**धर्माबाद (जि.नांदेड) तालुक्यामध्ये मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत रस्त्यांची कामे अत्यंत निकृष्ट दर्जाची झाल्याबाबत**

**(५०) १९५२१ (२१-११-२०२०). श्री.राजेश पवार (नायगांव) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
**(१)** धर्माबाद (जि.नांदेड) मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतंर्गत झालेली एम.डी.आर.-२० ते माष्टी, एम.डी.आर.-५३ ते रोषनगाव व एम.डी.आर-८३ ते पाटोदा या रस्त्यांची कामे अत्यंत निकृष्ट दर्जाची झाली असुन सदरहू रस्त्यांची कामे अपुर्ण अवस्थेत असल्याचे माहे नोव्हेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(३) असल्यास, त्यानुसार सदर रस्त्यांची कामे पूर्ण करण्यासह निकृष्ट दर्जाची काम करणाऱ्या कंत्राटदारावर कारवाई करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (२९-१२-२०२०) :** (१) व (२) हे अंशतः खरे आहे.
मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेच्या प्रचलीत धोरणानुसार सदर सर्व रस्त्यांची तपासणी राज्य गुणवत्ता निरिक्षक यांनी केली आहे. राज्य गुणवत्ता निरिक्षक यांनी तपासणी अंति सदर कामांना समाधानकारक शेरा दिला आहे.
कोविड-१९ ची टाळेबंदी (Lockdown), यावर्षी झालेला जास्तीचा पाऊस, निधीची अपूरी उपलब्धता व सदर कालावधीत गावकऱ्यांनी केलेल्या विरोधामुळे कामाची गती मंदावली आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :** **राजेन्द्र भागवत**
**मुंबई.** **सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.